महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१. दुर. २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५.

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001. Ph. 2267 0210/148/248, 22102222 Fax : 22673915.

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३. दुर. २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203. Ph.23742191 Fax : 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com


## लिपिक-टंकलेखक ( मराठी व इंग्रजी ) परीक्षा -२०१३

**जाहिरात क्रमांक : ३५२ /२०१३ क्रमांक १४४२/२०१३/बारा**

राज्य शासनाच्या मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील विविध कार्यालयातील **लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) या गट-क** संवर्गातील पदावरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे **रविवार दि. २६ मे, २०१३** रोजी **लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी)परीक्षा-२०१३** महाराष्ट्रातील ३५ जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| २. मंत्रालयीन विभागातील उपलब्ध पदसंख्या | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. .(ड) | इ.मा.व. |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | लिपिक-टंकलेखक (मराठी) (एकूण पदे-१५७) | ६४ | १० +३* | ६+१५* | २+९* | २ | -- | ३+८* | २+४* | १५+१४* |
| | महिला | १९ | ४ | ६ | ३ | १ | -- | ३ | २ | ९ |
| | माजी सैनिक | १० | २ | ३ | २ | -- | -- | २ | १ | ४ |
| | खेळाडू | ३ | १ | १ | १ | -- | -- | १ | -- | १ |
| | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -३ पदे, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु -१ पद, श्रवण शक्तीतील दोष -४ पदे | | | | | | | | |
| २ | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) (एकूण पदे-३६) | १४ | -- | ८* | १* | २* | -- | १* | ३* | ७* |
| | महिला | ४ | -- | ३ | -- | १ | -- | -- | १ | २ |
| | माजी सैनिक | २ | -- | २ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -२ पदे, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु -१ पद, श्रवण शक्तीतील दोष -२ पदे | | | | | | | | |
| ३. बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील उपलब्ध पदसंख्या | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
| १ | लिपिक-टंकलेखक (मराठी) (एकूण पदे-९१७) | ४८५ | १०६ | ७६ | २९ | २० | २० | २६ | १३ | १४२ |
| | महिला | १४६ | ३१ | २३ | ८ | ६ | ६ | ८ | ४ | ४३ |
| | माजी सैनिक | ७४ | १६ | ११ | ४ | ३ | ३ | ४ | २ | २१ |
| | खेळाडू | २५ | ५ | ४ | १ | १ | १ | १ | १ | ७ |
| | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी -६ पदे, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु -११ पदे, श्रवण शक्तीतील दोष -२ पदे | | | | | | | | |
| २ | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) (एकूण पदे-२५) | ११ | २ | ३ | १ | १ | १ | १ | १ | ४ |
| | महिला | ४ | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | १ |
| | माजी सैनिक | २ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग | श्रवण शक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | |

३.१ * अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

३.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

३.३ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

३.४ महिलांसाठी असलेले आरक्षण शासननिर्णय महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/म.से.आ. २०००/प्र. क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३.५ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

३.६ अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेव्दारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

३.७ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.

३.८ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

४. **वेतनश्रेणी** :- रूपये ५,२००-२०२००(ग्रेड पे-१९००) अधिक भत्ते

५. **पात्रतेच्या अटी** :-

५.१. :-भारतीय नागरीकत्व.

५.२ वयोमर्यादा :- **१ जून, २०१३** रोजी किमान **१८ वर्षे** असावे व **३३** वर्षापेक्षा जास्त नसावे.

**५.३. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम** :-

५.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत **५** वर्षांपर्यंत.

५.३.२ अपंग उमेदवारांच्या बाबतीत **४५** वर्षांपर्यंत.

५.३.३. पात्र खेळाडूंच्या बाबतीत **५** वर्षांपर्यंत.

५.३.४. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट,२०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.४ शैक्षणिक अर्हता** :-

५.४.१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) **उत्तीर्ण** अथवा तत्सम अर्हता.

५.४.२ लिपिक-टंकलेखक (मराठी) पदासाठी **मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट** व लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदासाठी **इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रति मिनिट**. सदर वेगाबाबत शासकीय परीक्षा मंडळाची परीक्षा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच **दिनांक १२ मार्च, २०१३** रोजी किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक.

५.४.३ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली

नसेल तर, ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.४.४ **लिपिक-टंकलेखक (इंग्रजी)** या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना म.ना.से. (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ मधील नियम-३ व ४ नुसार, एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखनाची प्रती मिनिट ३० शब्द गतीची परीक्षा, शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

५.४.५ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग-क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ व माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) दि.४/२/२०१३ नुसार अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

६. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील "**लिपिक-टंकलेखक परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे.

७. **शुल्क :** ७.१ अमागास - २६०/- ७.२ मागासवर्गीय - १३५/- ७.३ माजी सैनिक - १०/-

८. **अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक २० फेब्रुवारी, २०१३ ते १२ मार्च, २०१३** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहिल.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या **www.mpsconline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलना व्दारे (२) क्रेडिट कार्ड (३) डेबिट कार्ड (४) नेटबँकिंग (५) कॅशकार्ड

८.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस.आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status व्दारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.७ विहित पध्दतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा **कॅशकार्ड व्दारे** भरल्या नंतर उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (**pyament received**) **एस.एम.एस**. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status व्दारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

८.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसा नंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलव्दारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feed back व्दारे Ragistration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक पाठवावा.

८.९ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

८.१० परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा **क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डव्दारे रक्कम भरण्याची** कार्यवाही **दिनांक १२ मार्च, २०१३** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१०. चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक १३ मार्च, २०१३** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

११. लिपिक-टंकलेखक (मराठी,इंग्रजी) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपल्ब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : **२० फेब्रुवारी, २०१३.**

**संजय गंध्रे.**
सह सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**